


दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९१ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । १५/०४/२०२६ । पाने - ६




# संगमनेरमध्ये भीमजयंतीचा जल्लोष

## मान्यवरांकडून बाबासाहेबांना अभिवादन करत केला विचारांचा जागर


छाया – प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर शहरात अभूतपूर्व उत्साहाचे आणि चैतन्यमय वातावरणाचे दर्शन घडले. शहरातील मुख्य चौकातील बाबासाहेबांच्या पुतळा परिसरात सकाळपासूनच भीम अनुयायी, नागरिक आणि मान्यवरांची मोठी गर्दी उसळली होती.

जयंतीनिमित्त विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यामध्ये आमदार अमोल खताळ, आ. सत्यजित तांबे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, तसेच माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून महामानवाच्या कार्याला अभिवादन केले.

यावेळी प्रांताधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनीही शासनाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जय भीमच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. निळ्या ध्वजांनी सजलेले रस्ते आणि आकर्षक फुलांची सजावट यामुळे शहरात उत्सवाचे विशेष वातावरण निर्माण झाले होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतेचे विचार प्रेरणादायी

**जगात पद दलित आणि शोषितांच्या न्यायासाठी होणाऱ्या प्रत्येक क्रांतीमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे असतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवास्पद असणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले समतेचे आणि मानवतेचे विचार हे जगातील प्रत्येकासाठी सदैव प्रेरणादायी असून त्यांनी दिलेली राज्यघटना देशाला एकसंघ ठेवण्यासाठी जपा असे आवाहन काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.**

अनेक मंडळांकडून नागरिकांसाठी थंड पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. बसस्थानक परिसरातील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळही मोठी गर्दी होती; मात्र संगमनेरकरांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेत अभिवादन केले. कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. सायंकाळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून त्यामध्ये विविध कलापथके आणि आकर्षक चित्ररथ सहभागी होणार असल्याची माहिती उत्सव समितीने दिली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीमध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून डीजेचा गोंधळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जगाला समतेचा व मानवतेचा मंत्र देणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने शहरात मोठ्या उत्साहाने अभिवादन कार्यक्रम सुरू असताना महायुतीच्या काही कार्यकर्त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर व्यक्तिगत आणि उडत्या चालीचे गीते वाजून चालू कार्यक्रमात गोंधळ निर्माण केला. या प्रवृत्ती विरोधात तीव्र संताप आणि निषेध व्यक्त केला जात आहे. डीजे वाजवणाऱ्यांवर आणि पोलीस प्रशासनावर आमदार सत्यजित तांबे यावेळी चांगले संतापले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यान व जीवनगौरव पुरस्कार सुरू असताना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मुद्दाम गोंधळ निर्माण व्हावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर काही व्यक्तिगत व उडत्या चालीची गीते सुरू केली. अत्यंत शांततेमध्ये सुरू असलेल्या कार्यक्रमांमध्ये वारंवार अडथळा निर्माण करण्याचे काम महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून सुरू होते. डीजे चा आवाज वाढवला जात होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हा प्रकार अत्यंत अशोभनीय होता.

यावर वारंवार सूचना करूनही या कार्यकर्त्यांनी ऐकले नाही. यावेळी व्यासपीठावरून आमदार सत्यजित तांबे चांगलेच संतापले. पोलीस प्रशासन काय करते आहे. महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचे विचार सांगण्याचे काम सुरू असताना काही लोक मुद्दाम होऊन अडथळे निर्माण करत आहेत. आम्ही ४० वर्ष जयंती मोठ्या आनंदाने सर्वांना घेऊन साजरी करत आहोत. हे कधी कुठे होते का ? असा सवाल करताना असे वर्तन अत्यंत चुकीचे आहे. तातडीने डीजे बंद करा अशा सूचना त्यांनी पोलिसांना दिल्या. यानंतर प्रांताधिकारी, तहसीलदार यांसह पोलीस त्या ठिकाणी हजर झाले.

काही काळ डीजे बंद केल्यानंतर पुन्हा डीजे सुरू करण्यात आला. यानंतर मात्र वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते व ज्येष्ठ कार्यकर्त्या कुसुमताई माघाडे डीजे (पान २ वर)



# भोंदू खरातला पुन्हा पोलीस कोठडी



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमधील भोंदूगिरी आणि महिलांच्या शोषणाच्या आरोपांमध्ये अडकलेला अशोक खरात याच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. तिसऱ्या गुन्ह्यातील पोलिस कोठडी संपल्यानंतर आज त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने खरातला पुन्हा १८ एप्रिलपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव खरातला प्रत्यक्ष न्यायालयात न आणता ऑनलाईन पद्धतीने हजर करण्यात आले होते. मात्र सुनावणीच्या सुरुवातीलाच तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. न्यायालयाचा आवाज खरातपर्यंत पोहोचत नसल्याने काही वेळ सुनावणी थांबवावी लागली. नंतर अडथळा दूर झाल्यावर प्रक्रिया पुन्हा सुरू झाली. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना खरातने पोलिसांकडून कोणतीही मारहाण झालेली नसल्याचे स्पष्ट केले.

सरकारी पक्षाचे वकील अ‍ॅड. शैलेंद्र बागडे यांनी न्यायालयात जोरदार युक्तिवाद करत आरोपीच्या कारवायांचा तपशील मांडला. त्यांच्या मते खरात स्वत:ला देवाचा अवतार असल्याचे सांगून महिलांना आपल्या प्रभावाखाली आणत होता. तो महिलांना तांब्याच्या भांड्यातील पाणी आणि पेढे देत असे ज्यामध्ये गुंगी आणणारे पदार्थ मिसळले जात असल्याचा संशय आहे. या माध्यमातून महिलांवर मानसिक प्रभाव टाकून त्यांचे शोषण केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. (पान २)












# 'विकसित भारत'साठी शिक्षण क्षेत्राची भूमिका महत्त्वाची - राज्यपाल वर्मा



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सोमवारी स्पष्टपणे सांगितले की, राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रासमोर मोठे आव्हान उभे आहे. सध्या केवळ एक-दोन विद्यापीठांनाच राष्ट्रीय क्रमवारीत स्थान मिळत असून, ही स्थिती समाधानकारक नाही. राज्यातील सर्व विद्यापीठांनी गुणवत्ता, संशोधन आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून आपली कामगिरी उंचावणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

लोक भवन येथे आयोजित राज्यातील चार क्लस्टर विद्यापीठांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. क्लस्टर विद्यापीठांची संकल्पना तुलनेने नवीन असली, तरी त्यांच्याशी संलग्न असलेली महाविद्यालये ही दीर्घ परंपरा आणि प्रतिष्ठा असलेली आहेत. त्यामुळे या सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास राष्ट्रीय स्तरावर चांगले स्थान मिळवणे शक्य आहे, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला. विकसित भारत या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी शिक्षण क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे नमूद करत त्यांनी आरोग्यविषयक जबाबदाऱ्यांवरही भर दिला. विशेषतः क्षयरोग (टीबी) निर्मूलन ही देशासमोरील एक मोठी गरज असून, या अभियानात विद्यापीठांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी पोस्टर स्पर्धा, मराठी व हिंदीतील जिंगल्स तसेच विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान संबंधित विद्यापीठांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या कामांची माहिती सादर केली. नवीन अभ्यासक्रमांची आखणी, संशोधन प्रकल्प, कौशल्याधारित शिक्षण, विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया, उल्लेखनीय यश आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबरच्या सहकार्याबाबतही सविस्तर आढावा घेण्यात आला.

# हक्काचे पाणी द्या, शेतकऱ्यांनी कालव्यात सुरू केले आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय कालव्यातून पाणी सोडून तालुक्यातील डोंगरकडेच्या आंबड, धामणगाव आवारी, धुमाळवाडी, वाशेरे, टाकळी ढोकरी, गर्दणी आदी अवर्षण प्रवण गावांतील २३२८ हेक्टर व निम्नस्तरीय कालव्यातून ४२०० हेक्टरला तालुक्याच्या हक्काचे पाणी देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी निळवंडे धरणाच्या निम्नस्तरीय उजव्या कालव्यात धुमाळवाडी शिवारातील घोलपवस्ती येथे सोमवारी सायंकाळपासून ठिय्या देत टाळ-मृदुंगाच्या साथीने भजन आंदोलन सुरू केले.

सोमवारी येथील शासकीय विश्रामगृहात आंबड, धामणगाव आवारी, धुमाळवाडी, वाशेरे, टाकळी ढोकरी, गर्दणी आदी उच्चस्तरीय कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतकरी व जलसंपदा विभागाची बैठक झाली. अकोले तालुक्यातील निळवंडे जलाशयातून निम्नस्तरीय लाभक्षेत्रात ४२०० हेक्टर, तर उच्चस्तरीय कालव्यातून २३२८ हेक्टरला पाणी मिळणे नियोजित आहे पण निम्नस्तरीय कालव्याचे झाल्याने अस्तरीकरण अकोल्यातील लाभधारक वंचित राहू लागले आहे तसेच उच्चस्तरीय कालव्यातून २३२८ हेक्टर क्षेत्राला पाणी मिळण्यासाठी २७४ दशलक्ष घनफूट पाणी तरतूद केली असताना यंदा केवळ ७४ दशलक्ष घनफूट पाणी अकोले उच्चस्तरीय कालव्यातून मिळाल्याचे शेतकरी सांगतात. अकोल्याच्या हक्काचे उच्चस्तरीयचे २०० दशलक्ष घनफूट पाणी शिल्लक आहे. निळवंडेतून निम्नस्तरीय कालव्यांद्वारे १५ एप्रिलला सिंचनासाठी आवर्तन सोडण्यात येणार आहे. तालुक्याच्या पूर्वेकडील भागाला सिंचन पाणी

पळवण्याचा घाट शिजवला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. तालुक्याच्या हक्काचे पाणी द्या, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी कालव्यात राहुट्या टाकून, टाळ-मृदुंगाच्या साथीने भजन धरणे आंदोलन सुरू केले आहे.

यावेळी डॉ. अजित नवले, शिंदे सेनेचे बाळासाहेब भोर, आंबडचे सरपंच रेश्मा कानवडे, वाशेरेचे सरपंच किरण गजे, धुमाळवाडीचे उपसरपंच डॉ. रवी गोर्डे, परबत नाईकवाडी, आप्पा आवारी, भानुदास तिकांडे, भास्कर कानवडे, रोहिदास जाधव, नाथा भोर आदींसह शेतकरी उपस्थित होते.

## निळवंडेच्या पाण्यासाठी शेतकरी आक्रमक



# महाराष्ट्राची ऊर्जा क्षमता वाढणार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने सोमवारी एक ऐतिहासिक पाऊल पडले असून, छत्तीसगडमधील महानिर्मितीच्या मालकीच्या 'गारे पालमा' खाणीतून कोळशाची पहिली रेल्वे रॅक कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पहिल्या कोळसा रॅकचे उत्साहात स्वागत केले. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राला मोठी उभारी मिळणार असून, विदर्भाला राज्याचे 'ऊर्जा केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या स्वप्नाला बळ मिळाले आहे.

छत्तीसगड येथील गारे पालमा सेक्टर-२ या कोळसा खाणीतून आलेल्या या पहिल्या रेल्वे रॅकचे आगमन ऊर्जा स्वावलंबनाच्या प्रवासातील निर्णायक टप्पा मानला जात आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कोळसा हाताळणी प्रकल्पाची पाहणी करून उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे व इतर मान्यवर उपस्थित होते. या खाणीचे महत्त्व विशद करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गारे पालमा या खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत आहे. या उच्च गुणवत्तेमुळे वीजनिर्मितीची क्षमता तर वाढणारच आहे, शिवाय ऊर्जेसाठी लागणाऱ्या कोळशाचे प्रमाणही पूर्वीपेक्षा कमी होणार आहे. पुढील ७७ वर्षे राज्याला या खाणीतून उच्च दर्जाचा कोळसा मिळत राहणार आहे.

यामुळे भविष्यातील वीज तुटवड्याचा धोका कायमचा टळणार असून हे दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उच्च दर्जाच्या कोळशामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच वीज निर्मितीचा खर्च कमी होणार आहे. याचा थेट फायदा सर्वसामान्य ग्राहकांना वीज दरात कपातीच्या माध्यमातून होणार आहे. तसेच, राज्यातील लोडशेडिंगची समस्या दूर करून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे आता अधिक सुलभ होणार आहे.

# समृाट चौधरी होणार बिहारचे नवे मुख्यमंत्री; बुधवारी शपथविधी



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

बिहारच्या राजकारणात मोठे बदल झाले आहेत. नितीश कुमार यांनी राज्यसभेची शपथ घेतल्यानंतर आता बिहारला पहिले भाजपाचे मुख्यमंत्री मिळणार आहेत. सम्राट चौधरी यांच्या नावावर भाजपाने शिक्कामोर्तब केला आहे. तर नितीश कुमार यांचे पुत्र, निशांत कुमार, उपमुख्यमंत्री होण्याची शक्यता आहे. उद्या, १५ एप्रिल रोजी, सकाळी ११ वाजता लोक भवन येथे शपथविधी सोहळा पार पडणार असल्याची माहिती समोर आली आहे. तिथे मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांना शपथ दिली जाईल. निशांत कुमार आणि विजय चौधरी यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती जवळपास निश्चित आहे.होर्मुझच्या नाकेबंदीत अमेरिकेची झाली फजिती; मेथेनॉल घेऊन चीनचा टँकर सुरक्षित बाहेर पडलाबिहारच्या राज्यपालांच्या सचिवांनी सोमवारी सम्राट चौधरी यांची भेट घेतली. लोक भवनात होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासंदर्भात राज्यपालांच्या सचिवांनी त्यांची भेट घेतली आणि या सोहळ्याला उपस्थित राहणाऱ्या प्रमुख व्यक्तींविषयी त्यांना सविस्तर माहिती दिली. सम्राट चौधरी यांनी राज्यपालांच्या सचिवांसोबत संभाव्य मंत्र्यांच्या यादीवर चर्चा केली.नितीश कुमार राज्यसभेवर निवडून आल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्रीपद रिक्त झाले होते. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे कोणाच्या हाती जातील यावर बऱ्याच काळापासून चर्चा सुरू होती. अनेक नावे पुढे आली होती, पण अंतिम नाव सम्राट चौधरी यांचे निश्चित झाले आहे.सम्राट चौधरी कोण आहेत?सम्राट चौधरी यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९६८ रोजी झाला. त्यांचा विवाह ममता कुमारी यांच्याशी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शकुनी चौधरी आणि आईचे नाव पार्वती देवी आहे.

सम्राट चौधरी यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. त्यांचे वडील, शकुनी चौधरी, एक समाजवादी नेते मानले जातात. शकुनी चौधरी एकेकाळी लालू प्रसाद यादव यांचे जवळचे सहकारी होते. नंतर, शकुनी चौधरी यांनी आपली राजकीय दिशा बदलली आणि नितीश कुमार यांच्यासोबत काम करायला सुरुवात केली.

# रुग्णांसाठी दिलासादायक निर्णय

## मदत प्रक्रिया झाली डिजिटल



मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षासाठी आता ऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. या नवीन प्रणालीमुळे वैद्यकीय मदतीसाठी अर्ज मंजुरीची प्रक्रिया अवघ्या ८ तासांत पूर्ण होणार असून, लवकरच रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रणालीचं उद्घाटन करण्यात येणार आहे.

नव्या व्यवस्थेनुसार रुग्णाला स्वतंत्रपणे अर्ज करण्याची गरज राहणार नाही. संबंधित रुग्णालयच रुग्णाची कागदपत्रे तपासून अर्ज थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठवणार आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद होणार आहे. तसेच, रुग्णालयात आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर पुढील सर्व प्रक्रिया प्रशासनाच्या माध्यमातून पार पडणार असल्यानं रुग्ण आणि नातेवाईकांची धावपळ कमी होईल. या नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया वेगवान होणार असून सर्व कागदपत्रे पूर्ण आणि नियमांनुसार असल्यास केवळ ८ तासांत मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांना तातडीनं आर्थिक मदत मिळून उपचारांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मदत कक्षामध्ये रुग्णस्नेही बदल करण्यात आले असून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल करण्यात आली आहे. यामुळे पारदर्शकता वाढेल आणि विलंब टाळता येईल. रुग्णालय प्रशासन, मदत कक्ष आणि शासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होणार असल्यानं सेवा अधिक सक्षम होईल.

मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी नागरिकांना १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन केलं आहे. या ऑनलाईन प्रणालीमुळे वैद्यकीय मदत मिळवण्याची प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक होणार असून यामुळे गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळून त्यांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

# अमेरिका-इराण तणाव कायम

## दुसऱ्या फेरीच्या चर्चेकडे जगाचे लक्ष



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानच्या इस्लामाबादेत झालेली पहिल्या फेरीतील शांतता चर्चा निष्फळ ठरली. आता दुसऱ्या फेरीत काय होते? हे बघण्यासारखे असेल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणने करारासंदर्भात पुन्हा उत्सुकता दर्शवली आहे. त्यांनी अमेरिकेला तसा संदेशही पाठवला आहे. तर, उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांनीही इस्लामाबाद चर्चेत काही प्रमाणात प्रगती झाल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात बोलतान ट्रम्प म्हणाले, सध्या अमेरिकेने इराणवर कडक नाकेबंदी लागू केली असून त्यांचा कोणताही व्यापार सुरू नाही. इराणकडे कुठल्याही प्रकारची अण्वस्त्रे नसतील. यासाठी ते सहमत नसतील, तर कुठल्याही प्रकारचा करार होणार नाही. आम्ही, कुठल्याही देशाला, जगाला ब्लॅकमेल करण्याची परवानगी देऊ शकत नाही.. दरम्यान, इराणने अणुमुद्यासंदर्भात सकारात्मक कल दर्शवला असून ट्रम्प प्रशासनाला ही चर्चा लांबवण्याची इच्छा नाही, असे जे. डी. व्हान्स यांनी म्हटले आहे. सीएनएनच्या वृत्तानुसार, ट्रम्प प्रशासनाचे अधिकारी दुसऱ्या फेरीच्या चर्चेसाठी अंतर्गत तयारी करत आहेत. पुढील आठवड्यात सीझफायरची मुदत संपण्यापूर्वी ही बैठक पार पडू शकते. यासाठी जिनेव्हा आणि इस्लामाबाद ही दोन ठिकाणे चर्चेत असून १६ एप्रिल ही संभाव्य तारीख असू शकते. या प्रक्रियेत तुर्की देखील दोन्ही देशांमधील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. तत्पूर्वी, इस्लामाबादमधील चर्चेदरम्यान, अमेरिकेने इराणला २० वर्षांसाठी युरेनियम संवर्धन थांबवावे आणि देशातून आपला उच्च संवर्धित साठा हटवण्याची अट घातली होती. मात्र, इराणने कमी कालावधीत आणि नियंत्रित पद्धतीने कपात करण्याचा प्रस्ताव दिला होता. या मुद्द्यावरील मतभेदांमुळे करार होऊ शकला नाही. मात्र, आता इराण अणुसंवर्धनावर काही तडजोड करण्यास सहमत झाला असल्याचे समोर येत आहे. इस्लामाबादमध्ये झालेल्या चर्चेत अमेरिकेने इराणला २० वर्षांपर्यंत युरेनियम संवर्धन बंद करण्याची अट घातली होती, तर इराणने ती कमी कालावधीसाठी असावी असा प्रस्ताव दिला होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर..

पान १ वरून - सुरू असलेल्या ठिकाणी आल्या आणि चांगल्या संतापल्या. चालू कार्यक्रमांमध्ये धुडगूस घालण्याचा तुमचा उद्देश आहे. हे वर्तन अत्यंत बेशिस्त आहे. अशी पद्धत संगमनेर मध्ये कधीच नव्हती. हे घाणेरडे प्रकार तुम्ही सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी ज्येष्ठ महिला कार्यकर्त्या माघाडे ताई यांना अत्यंत उद्धट उत्तरे दिली. त्यामुळे त्या ठिकाणी उपस्थित असलेले सर्व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सर्व रस्ते ट्रॅफिक जाम झाले. या ठिकाणी झालेल्या गोंधळामुळे प्रशासनाची ही तारांबळ उडाली. हा प्रकार म्हणजे म्हातारी मेल्याचे दुःख नव्हे तर काळ सोकावतो आहे अशी प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली असून या घटनेचा संगमनेर तालुक्यासह राज्यभरातून तीव्र निषेध होत आहे.

# भोंदू खरातला पुन्हा...

पान १ वरून - सरकारी वकिलांनी पुढे सांगितले की, या गुन्ह्यामध्ये वापरलेले औषध नेमके काय होते, तसेच आरोपीने कोणत्या प्रकारच्या वस्तू किंवा रत्नांचा वापर करून ही भोंदूगिरी केली, याचा शोध घेणे आवश्यक आहे. यासाठी सखोल चौकशीसाठी अतिरिक्त कोठडीची गरज असल्याचे त्यांनी न्यायालयासमोर मांडले. या मुद्द्यांवरून तपासाचे गांभीर्य अधोरेखित करण्यात आले. दरम्यान, आरोपीच्या बाजूने ॲड. सचिन भाटे यांनी पोलिस कोठडीला विरोध केला. त्यांनी युक्तिवाद केला की, यापूर्वीच्या गुन्ह्यांमध्येही पोलिसांनी अशाच प्रकारे कोठडी मागितली होती आणि आवश्यक तपास पूर्ण झाला आहे. त्यामुळे पुन्हा कोठडी देण्याची गरज नसल्याचा दावा त्यांनी केला. मात्र सरकारी पक्षाने हा गुन्हा वेगळ्या महिलेशी संबंधित असल्याचे सांगत अधिक तपासाची गरज अधोरेखित केली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने पोलिसांचा युक्तिवाद ग्राह्य धरत खरातला पाच दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली. या कालावधीत तपास यंत्रणा आरोपीच्या कार्यपद्धतीबाबत आणखी माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे.

# विधानभवन प्रवेश पास घोटाळा

## तीन कर्मचारी निलंबित, सहा जणांना अटक



मुंबई (वृत्तसंस्था)

अर्थसंकल्पीय अधिवेशनातील प्रवेश पास घोटाळा प्रकरणी विधानभवनातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या तिघांनाही अटक करण्यात आली होती. चौथा कर्मचारी अद्याप पसार आहे. निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये विधानभवनातील लिपिक-टंकलेखक महेश पिराजी दुम्पलवार, मनोज आनंदा मोरबाळे आणि शिपाई स्वप्निल रमेश तायडे यांचा समावेश आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी त्यांच्या निलंबनाच्या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर आदेश काढण्यात आले. विधानभवनचा कर्मचारी असलेला चौथा आरोपी लवेश नाकटे पसार आहे. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या कार्यालयातून एमआयडीसीच्या लेटरहेडवर पास देण्यासंबंधीचे विनंती पत्र तयार करण्यात आले आणि त्या आधारे पास दिले जात होते. तथापि असे पत्र आपल्या कार्यालयाने दिलेच नाही असे सामंत यांनी विधान परिषदेत सांगितल्यानंतर सभापती प्रा.राम शिंदे यांनी या प्रकरणी सखोल चौकशीचे आदेश दिले होते. या चौकशीत धक्कादायक बाबी समोर आल्या. विधानभवनातील अन्य कर्मचारी, अधिकारी या घोटाळ्यात सामील असल्याची शक्यता आहे. सातपैकी सहा आरोपींना अटक झाली. त्यात निलंबित तिघे आणि सुरक्षा रक्षक नागेश पाटील, गणपत जावळे आणि दत्तात्रय गुंजाळ यांचा समावेश आहे.

# त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शनाचा काळाबाजार प्रकरणी शरद पवार गटाच्या नेत्याला अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानमध्ये देवदर्शनाच्या नावाखाली भाविकांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे प्रदेश युवक कार्याध्यक्ष आणि मंदिर संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग ला नाशिक पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात आणि मंदिर प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, त्र्यंबकेश्वर मंदिरात 'व्हीआयपी' दर्शनाच्या नावाखाली भाविकांकडून पैसे उकळल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. ११ एप्रिल रोजी नाशिकच्या पंचवटी भागातील भाविक अनंता सुरेश मेहंदळे आणि त्यांचे मित्र दर्शनासाठी आले होते. त्यांनी २०० रुपयांचा अधिकृत देणगी पास घेतला होता, मात्र रांगेत उभे असताना संशयितांनी त्यांना गाठले. रांगेतून दर्शनाला ४-५ तास लागतील, आम्ही १० मिनिटांत दर्शन घडवून देतो, असे आमिष दाखवून संशयितांनी या भाविकांकडून ३ हजार रुपये रोख स्वीकारले. देवस्थान ट्रस्टची कोणतीही अधिकृत 'पेड दर्शन' सुविधा नसतानाही, भाविकांना आत सोडून त्यांची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी अनंता मेहंदळे यांनी त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या प्रकरणात पोलिसांनी सर्वात आधी गोटीराम मनाजी पेहरे आणि अभिषेक कडलग (पुरुषोत्तम कडलगचा पुतण्या) या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला होता. गोटीरामला तात्काळ अटक करण्यात आली, तर अभिषेक कडलग सध्या फरार आहे. तपासादरम्यान या संपूर्ण रॅकेटमध्ये विश्वस्त पुरुषोत्तम कडलगचा सहभाग असल्याचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले, यानंतर सोमवारी रात्री पुरुषोत्तम कडलगला अटक करण्यात आली. त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी प्रवेशासाठी कडक नियम आहेत. सुरक्षारक्षक कोणालाही थेट प्रवेश देत नाहीत; त्यासाठी विश्वस्तांची परवानगी किंवा फोन आवश्यक असतो. नोंदवहीमध्ये भाविकाचे नाव, कोणाच्या सांगण्यावरून प्रवेश दिला याची सविस्तर नोंद करणे बंधनकारक असते. एवढी काटेकोर व्यवस्था असताना बाहेरील व्यक्ती भाविकांना थेट मंदिरात कशी नेऊ शकतात? असा सवाल उपस्थित केला जात होता. आता खुद्द विश्वस्तालाच अटक झाल्याने, या भ्रष्टाचाराचे मूळ थेट संस्थानच्या आतपर्यंत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# डॉ. आंबेडकरांनी दिलेली राज्यघटना जपा - माजी मंत्री थोरात

संगमनेर (प्रतिनिधी)-

जगात पददलित आणि शोषितांच्या न्यायासाठी होणाऱ्या प्रत्येक क्रांतीमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे असतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवास्पद असणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले समतेचे आणि मानवतेचे विचार हे जगातील प्रत्येकासाठी सदैव प्रेरणादायी असून, त्यांनी दिलेली राज्यघटना देशाला एकसंघ ठेवण्यासाठी जपा, असे आवाहन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.



डॉ. आंबेडकर जयंतीदिनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठाणच्यावतीने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भास्करराव बागुल यांना जीवनगौरव पुरस्कार तर छात्रभारतीचे राज्यअध्यक्ष अनिकेत घुले यांना प्रेरणा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर पुतळा येथे अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, सुधाकरराव रोहम, उत्कर्षाताई रूपवते, भास्करराव बागुल, के. एस. गायकवाड, माणिकराव यादव, अनिकेत घुले, श्रीमती कुसुमताई माघाडे, प्रा. शशिकांत माघाडे, गौतम गायकवाड, हिरालाल पगडाल, ड. अमित सोनवणे, डॉ. गोसावी, विश्वासराव मुर्तडक, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आज संपूर्ण जगामध्ये अभिवादन होत आहे. हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठे व्यक्तिमत्त्व आहेत. देशाच्या आणि आपल्या सर्वांच्या वाटचालीमध्ये त्यांचे योगदान राहिले आहे. राज्यघटनेमुळे अनेकांना पदे मिळाली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत कठीण काळामध्ये शिक्षणाला सुरुवात केली. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज यांनी त्यांना शिक्षणासाठी मोठी मदत केली. कायदेतज्ज्ञ, इतिहासकार, समाजतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ असलेल्या डॉ. आंबेडकरांमध्ये मोठी विद्वत्ता होती.

पददलित आणि शोषितांसाठी त्यांनी लढा दिला. त्यांचे जीवन सुंदर करण्यासाठी आयुष्य समर्पित केले. कामगार, शेतकरी यांच्या जीवनात आनंद निर्माण केला. जगामध्ये ज्या ज्या वेळेस शोषितांसाठी चळवळी होतात, त्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवता व समतेची राज्यघटना देशाला दिली. सर्वांना मताचा अधिकार मिळाला. प्रगत असलेल्या अमेरिकेमध्ये मताच्या हक्कासाठी मार्टिन ल्युथर किंग ज्युनिअर याने १९६८ मोठा लढा दिला. दक्षिण आफ्रिकेमध्ये २७ वर्ष जेलमध्ये असलेल्या नेल्सन मंडेला यांनी समतेसाठी लढा दिला. या दोघांनीही महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आं यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे विविध पदाधिकारी व मान्यवर कार्यकर्ते, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केवळ नाचून नव्हे, वाचून साजरी करूया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

मित्रांनो, १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आहे. सार्वजनिक ठिकाणी प्रतिमांना हार घालून, शोभायात्रा काढून, व्याख्यानांचे आयोजन करून जयंती आपण साजरी करीत असतो. पण वैयक्तिकरित्या आपण ही जयंती कशी साजरी करू शकू, हा विचार करण्याचीही गरज आहे.



यासाठी दिवसभरातून किमान १३५ मिनिटे आपण वाचन करूया. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तकप्रेम आपल्या सर्वांना परिचित आहे. अभ्यासू, व्यासंगी व्यक्तिमत्व असणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन आपणही या दिवशी किमान १३५ मिनिटे विविध पुस्तकांचे वाचन करूया.

दिवसभरातील २४ तासात १४४० मिनिटे आपल्याला उपलब्ध आहेत. त्यातील किमान १३५ मिनिटे, म्हणजे सव्वा दोन तास, आपण वाचनासाठी देऊया. आमच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींनी हा संकल्प केला आहे. उद्या प्रत्येक जण किमान १३५ मिनिटे वाचन करणार आहे. आपणही आपल्या कुटुंबात अशा रीतीने ही जयंती साजरी करू शकतो.

आमच्या घरातील वैयक्तिक वाचनालयात भरपूर पुस्तके आहेत. यात धार्मिक ग्रंथांपासून विविध आत्मचरित्रे, कादंबऱ्या, कथासंग्रह, ललित लेख संग्रह, काव्यसंग्रह, प्रवास वर्णने अशी विविधता आहे. आपल्यासाठी सकाळी सात ते रात्री नऊ वाजेपर्यंत हे वाचनालय खुले आहे. आपल्या आवडीची पुस्तके आपण उद्या आमच्या घरी येऊन वाचू शकता. त्यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था आहे.

चला तर मग, या नव्या संकल्पाला आपण साथ देऊया आणि वाचून ही जयंती आपण साजरी करूया.

मुकुंद वसुंधरा कृष्णराव डांगे.

# कडक उन्हाळ्यात उष्माघातापासून सावध रहा – डॉ. जगदीश वाबळे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-



मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे कार्यरत असलेले डॉ. जगदीश वाबळे यांनी नागरिकांना उन्हाळ्यात आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. एप्रिल आणि मे महिन्यात कडक उन्हाळा असतो. या काळात अनेक आजारांचा धोका वाढतो. विशेषतः उष्माघात (सन स्ट्रोक) होण्याची शक्यता जास्त असते. शरीर दुर्बल असलेल्या व्यक्तींना याचा अधिक धोका निर्माण होऊ शकतो.

भर दुपारी उन्हात फिरणे टाळावे, कारण या काळात शरीराची तापमान नियंत्रित करण्याची क्षमता कमी होते. वेळेत योग्य उपचार न घेतल्यास मेंदू, हृदय आणि किडनी यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

उन्हाळ्यात भरपूर पाणी पिणे आवश्यक असून, लिंबूपाणी, नारळपाणी, ताक यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन करणे फायदेशीर ठरते. हलकी व सुती कपडे परिधान करणे, तसेच टरबूज, खरबूज यांसारखी पाण्याने भरपूर फळे खाणे आवश्यक आहे. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनी शक्यतो दुपारच्या वेळी घराबाहेर जाणे टाळावे.

मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये विविध तज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध असून, सर्व प्रकारच्या आजारांवर तात्काळ व योग्य उपचार केले जातात. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत आणि अनुभवी डॉक्टरांची टीम सदैव सेवेत आहे. विविध शस्त्रक्रिया येथे यशस्वीरित्या पार पाडल्या जातात.

उपलब्ध शासकीय योजनांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, एमपीकेएवाय (महाराष्ट्र पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना) आणि ईसीएचएस (माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना) यांचा समावेश आहे. तसेच, ज्या शस्त्रक्रिया योजनांमध्ये समाविष्ट होत नाहीत, त्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गतही उपचार सुविधा उपलब्ध असल्याची माहिती केंद्रप्रमुख डॉ. स्नेहल गायके यांनी दिली.

# 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट' स्वप्नांना दिशा देणारे केंद्र - सौ. वैद्य

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा लाभलेल्या डॉ. नामदेवराव गुंजाळ यांचे सुपुत्र डॉ. हर्षवर्धन गुंजाळ (ज्यांना मी प्रेमाने 'हर्षू' म्हणते) यांनी स्थापन केलेल्या व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटला आज भेट देण्याचा योग आला. खरं तर बर्याच दिवसांपासून व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटबद्दल ऐकत होते. आज मी मुद्दामहून माझ्या कामाच्या व्यस्त शेड्यूलमधून वेळ काढला, प्रा. राहुलकुमार मिसरा यांना फोन केला आणि व्हिजन कोचिंग इन्स्टिटट्यूटला भेट दिली. माझ्यासाठी हा केवळ एका शैक्षणिक संस्थेला दिलेली भेट नसून, एका शिक्षिकेसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता. कारण, हर्षू आमच्या शाळेच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी असून, आज त्याला एका यशस्वी उद्योजकाच्या आणि मार्गदर्शकाच्या भूमिकेत पाहताना ऊर अभिमानाने भरून आला.



जेव्हा एखादा विद्यार्थी स्वतःच्या कष्टाने आणि कल्पकतेने आपल्या करिअरची मुहूर्तमेढ रोवतो, तेव्हा त्याच्या पालकांइतकाच आनंद आणि समाधान त्याच्या शिक्षकांनाही मिळत असते. 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'च्या रूपाने हर्षूने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी यशाचे एक नवे द्वार उघडले आहे.

आधुनिक सुविधा आणि कल्पक मांडणी, या इन्स्टिट्यूटचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे येथील 'इंटीरियर' आहे. डॉ. हर्षवर्धन यांनी अतिशय कल्पकतेने आणि सुंदर पद्धतीने या वास्तूची रचना केली आहे. अभ्यासासाठी पोषक वातावरण आणि प्रसन्नता येथे पावलोपावली जाणवते. केवळ भौतिक सुविधाच नव्हे, तर येथील कर्मचारी वर्ग (स्टाफ) देखील अत्यंत अनुभवी, उत्साही आणि विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर वाटला.

विद्यार्थ्यांच्या भविष्याची कवचकुंडले, आजच्या स्पर्धात्मक युगात आयआयटी, जेईई आणि नीट सारख्या परीक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'मध्ये या परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक असलेल्या सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाची आणि मानसिक तयारीची योग्य काळजी येथे घेतली जाते, हे पाहून समाधान वाटले.

एक उज्ज्वल भविष्याची नांदी, विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी 'व्हिजन इन्स्टिट्यूट'ने उचललेले हे पाऊल नक्कीच कौतुकास पात्र आहे. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने सुरू झालेला हा 'सिंहाचा वाटा' भविष्यात अनेक यशस्वी डॉक्टर आणि इंजिनिअर्स घडवेल, याची मला खात्री आहे. मी डॉ. हर्षवर्धन गुंजाळ यांना त्यांच्या पुढील वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यासाठी मनापासून खूप खूप शुभेच्छा देते. तुमच्या या शैक्षणिक यज्ञातून यशाच्या नवनवीन शिखरांना गवसणी घालणारे विद्यार्थी घडोत, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

संज्योत वैद्य, स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर.

# एमपीएससी भरती प्रक्रियेत बदल
## मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)-

राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. त्यामध्ये, आशाताईंच्या नावाने संगीत अकॅडमीसह पदभरती प्रक्रियेत सुधारणा, मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठाच्या स्थापनेसह आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.




ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्यावतीने मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करणार आहे. राज्य सरकारकडे वांद्रे-अंधेरी दरम्यान हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची आशा भोसले यांनी मागणी केली होती. आता, आशा भोसले यांच्या नावाने स्मारक करायच का?, असं मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मुद्दा उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी बोलताना आशाताईंनी दिलेला प्रस्तावच आपण पुढे नेऊ, असे सांगितलं. त्यामुळे, आता वांद्रे-अंधेरी दरम्यान आशाताईंच्या नावाने 'संगीत अकॅडमी' उभारण्यात येणार असल्याचे निश्चित झालं आहे. यासंदर्भात जागा शोधण्यासाठी म्हाडाला आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे, मृत्यूनंतर राज्य सरकारने आशाताईंची मागणी मंजूर केल्याचं दिसून येतं.

शासन सेवेतील पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करणार. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून कृती आराखडा. एमपीएससीच्या माध्यमातून घेणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या ५३ वरून १५३. संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने काही सेवांचा समावेश होणार. भरती प्रक्रिया सुलभ होणार. युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबविणार. (सामान्य प्रशासन विभाग).

कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडियमच्या आरक्षणात बदल करून वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरित करण्याचा निर्णय. (नगरविकास विभाग).

मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी. कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेमुळे कुशल मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार. (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग).

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छीमारांसाठी मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी. (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग).

राज्यातील वैद्यकीय शिक्षण प्रणाली, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार. सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (जायका) कडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्य उपलब्ध होणार. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग).

नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्ह्यांचा समावेश. त्यामुळे सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५०, अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये संतुलित, सर्वांगिण व गतिमान विकासाच्या योजना राबविणार. (नियोजन विभाग). वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार प्रशासन व संस्थात्मक रचनेत बदल होणार. परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीच्या ऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने होणार. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग).

# सिन्नर-जामनेर थेट बस सेवेची मागणी, प्रवाशांच्या अडचणींकडे लक्ष वेधले
## दत्तात्रेय गोसावी यांच्याकडून निवेदन

नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)-

सिन्नर आगारातून जामनेरपर्यंत थेट बससेवा सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय गोसावी यांनी जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सध्याच्या परिस्थितीत या मार्गावर थेट बससेवा नसल्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.



सिन्नर, निफाड, मनमाड, चाळीसगाव मार्गे जामनेरकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असून विद्यार्थ्यांपासून नोकरदार, व्यापारी आणि शेतकरी वर्गाला वारंवार प्रवास करावा लागतो. मात्र थेट बससेवा नसल्यामुळे अनेकदा बस बदलावी लागते, परिणामी वेळ आणि खर्च दोन्ही वाढत असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली आहे.

प्रस्तावित मार्गानुसार ही बस बारागावपिंप्री, हिवरगाव, सायखेडा, निफाड, लासलगाव, मनमाड, नांदगाव, चाळीसगाव, भडगाव-पाचोरा आणि पहूर मार्गे जामनेर येथे पोहोचेल. या मार्गामुळे मधल्या गावांतील प्रवाशांनाही थेट बससेवेचा लाभ मिळणार असून ग्रामीण भागासाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे.

ही बस सिन्नर आगारातून दररोज सकाळी सात वाजता सुटावी आणि सायंकाळी त्याच मार्गाने परत यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या सेवेमुळे प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेची बचत करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, नाशिक विभागीय नियंत्रक आणि सिन्नर आगार व्यवस्थापक यांना देण्यात आल्या आहेत. लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिक व प्रवासी वर्गाकडून या मागणीला जोरदार पाठिंबा मिळत असून, बससेवा सुरू झाल्यास सिन्नर-जामनेर प्रवास अधिक सुलभ होईल, अशी भावना व्यक्त होत आहे

## संपादकीय...

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## प्रेरक उद्धारक आणि तारक महाशक्ती

भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषांत विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांच्या जयंतीनिमित्त हा लेख त्यांना अभिवादन करण्याचा एक प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक आणि कायदे या सर्वच क्षेत्रांत त्यांनी आपली अमिट छाप उमटवली. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने आणि कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलित, श्रमिक आणि शोषितांच्या जीवनात जागृती निर्माण केली. त्यांनी बहुजन समाजात स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद दिली. बाबासाहेब हे केवळ विचारवंत नव्हते, तर त्यांनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण ज्ञान आणि शक्ती अर्पण केली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. १४ एप्रिल १८९१ रोजी त्यांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. त्यांच्या वडिलांनी त्यांच्यात चांगले संस्कार रुजवले आणि शिक्षणाची गोडी लावली. त्यामुळे आयुष्यभर त्यांनी अभ्यास, चिंतन आणि ज्ञानार्जनाची परंपरा जोपासली. संत तुकाराम आणि कबीर यांसारख्या संतांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर प्रभाव दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सत्य आणि न्यायाच्या मार्गावर चालणारे मार्गदर्शक होते. त्यांनी जातिभेदाला समाजाची मोठी समस्या मानली आणि त्याविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यांच्या मते, जातीय भेदभाव नष्ट झाल्याशिवाय समाजात एकात्मता निर्माण होऊ शकत नाही. त्यांनी समाजातील तळागाळातील लोकांना बौद्धिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मोठा लढा दिला. स्त्रियांना समान हक्क मिळावेत, यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या आणि त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणली. शिक्षणाबद्दल त्यांची नितांत श्रद्धा होती. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे असे सांगत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या मते, शिक्षणामुळे माणसाला आपले हक्क आणि कर्तव्यांची जाणीव होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी प्रयत्न केले. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून त्यांनी शिक्षणसंस्था उभारल्या आणि समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या विचारांत राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रनिष्ठा स्पष्टपणे दिसून येते. धर्मांतराच्या निर्णयानंतरही त्यांनी देशप्रेमाची भूमिका ठाम ठेवली. आम्ही या भारत देशाची संतान आहोत, असे सांगत त्यांनी देशाप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. समाजहित आणि राष्ट्रहित यांचा समतोल राखणारे विचार त्यांनी मांडले. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले, पण त्यांच्या कार्याचा ठसा आजही समाजावर कायम आहे. त्यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यामुळेच समाजात परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून एक विचारप्रवाह आहेत. त्यांचे जीवन संघर्ष, जिद्द आणि यशाचे प्रतीक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचा संकल्प केला पाहिजे. समाजात समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

!! जयंतीनिमित्त विश्ववंद्य महामानवास विनम्र अभिवादन !!

श्री. कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
(दिनविशेषकार.)

# सुकेवाडीतील श्री कान्होबा देवस्थान भक्ती, परंपरा आणि एकोप्याचे प्रतीक



संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते. या देवस्थानात हिंदू रिती-रिवाजानुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध, हार, फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता, तर सायंकाळची आरती सायंकाळी ७:३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप केले जाते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे.

देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते. देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी नेमले असून, आकाश शशिकांत सातपुते (सुकेवाडी), अशोक महादू खर्डे (सुकेवाडी) हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत. नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. एप्रिल २०२६ महिन्यातील ३० दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून, हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी वैभव विजय थोरात, नानासाहेब रामभाऊ सातपुते, निलेश रामनाथ सातपुते, सूर्यभान रामभाऊ सातपुते, राहुल नंदू खिलारी, अशोक केरू सातपुते, दत्तात्रय विठ्ठल सातपुते, महेश कचरू शिंदे, सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे.

दर पौर्णिमेला देवस्थानात होम-हवनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे आदी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून, हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी दीपक साहेबराव शिंदे, अनिल उत्तम कुटे, प्रवीण बाजीराव सातपुते, राहुल अण्णासाहेब घोडे, किरण बाळासाहेब सातपुते, अनिकेत नामदेव कांदळकर यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे. सुकेवाडीतील हे नाथ सिद्धपीठ केवळ धार्मिक स्थळ नसून गावकऱ्यांच्या एकोप्याचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. नित्य पूजा, पौर्णिमेचे होम-हवन, गुरुवारची महाआरती आणि महाप्रसाद या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती अधिकारी)-

राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक २०२६ च्या अनुषंगाने मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे द्वितीय प्रशिक्षण दिनांक १२ व १३ एप्रिल २०२६ रोजी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील नानासाहेब पवार सभागृह व सावित्रीबाई फुले हायस्कूल येथे पार पडले. या प्रशिक्षणासाठी १ हजार ८३४ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षण स्थळी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेची सैद्धांतिक माहिती देण्यासोबतच ईव्हीएम मशीन हाताळणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले.

या प्रशिक्षणास निवडणूक निरीक्षक देवानंदा रेयांग, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया, निवडणूक निर्णय अधिकारी अनुप सिंह यादव, जिल्हा नोडल अधिकारी गौरी सावंत व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अमित पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षणाची मुख्य जबाबदारी राहुरीच्या निवासी नायब तहसीलदार संध्या दळवी यांनी पार पाडली.

हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता निवडणूक नायब तहसीलदार बडे, महसूल नायब तहसीलदार बाचकर, सर्व मंडळ अधिकारी, राहुरीचे ग्राम महसूल अधिकारी, सर्व झोनल अधिकारी व मनुष्यबळ व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.


**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

DRSGWF's
**Vrindawan Homoeopathic Medical College & Hospital**
(MHF's Homoeopathic Medical College and Hospital)
Chandanapuri Ghat, Sangamner, Dist.-Ahilyanagar, Maharashtra
Email- mhfhmc@gmail.com
Phone- 9922382566, 9822314520
(AFFILIATED TO M.U.H.S., NASHIK & NCH NEW DELHI)
WALK IN INTERVIEW

Application are invited from the Eligible Candidates for the following posts

| Sr. No. | Type Of Post | Vacant Post |
|---|---|---|

| Sr. No. | Dept. / Subject | Vacant Post: Professor | Vacant Post: Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|
| 1 | Anatomy | 01 | 01 |
| 2 | Surgery | 01 | |
| 3 | Obstetrician & Gynecology | 01 | |
| 4 | Repertory | 01 | |
| 5 | Statistical Assistant | 01 | |

Candidates holding Essential Qualifications & Experience as per Rules & Regulations of NCH- NewDelhi & MUHS- Nashik will be eligible to apply.
The applicants are to submit their application within 15 days on Email- mhfhmc@gmail.com
Principal


**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता - मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

**GRAPHIC DESIGNER**
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**श्री साई मेस**
आमच्याकडे शुद्ध शाकाहारी घरगुती मेस आहे
शुद्ध शाकाहारी जेवण तयार करुन मिळेल संगमनेर
8530530656

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता - तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता- समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क- प्रताप गोडगे
9890924380

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क - नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे - ०२ जागा
(गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे - ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी अ‍ॅग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला, वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# करोडोंच्या अपहरण प्रकरणी मंदार पावडेला अटक



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)

अकोले पंचायत समिती अंतर्गत मवेशी, ब्राम्हणवाडा आणि शेंडी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील तब्बल ३ कोटी ६४ लाख ५ हजार रुपयांच्या अपहार प्रकरणात मुख्य आरोपी मंदार पावडे याला अखेर राजूर पोलिसांनी अटक केली. या कारवाईनंतर संपूर्ण आरोग्य विभागात खळबळ उडाली.

या प्रकरणात यापूर्वी परिचर युवराज डगळे आणि आरोग्य सहाय्यक बाळासाहेब लोंढे यांना अटक करण्यात आली होती. तर दुसरा मुख्य आरोपी भीमाशंकर देशमुख याच्या अटकपूर्व जामीनाबाबत उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. दरम्यान, फरार असलेला मंदार पावडे हा खुंटेवाडी येथे सापडल्याने सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार व पोलिस कर्मचारी सचिन शिंदे यांनी त्याला अटक केली.

वर्षे चौकशी समितीच्या अहवालानुसार २०१७ ते २०२४ या कालावधीत विविध बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय निधीचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात तब्बल ५६ आरोग्य कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तसेच कनिष्ठ सहायक मंदार पावडे, भीमाशंकर देशमुख व जिल्हा परिषद आरोग्य विभागातील लेखाधिकारी संतोष घुले यांना निलंबित करण्यात आले होते. पोलिस चौकशीत मंदार पावडे याने काही धक्कादायक माहिती दिल्याची चर्चा असून, तत्कालीन बीडीओ, लेखाधिकारी, डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचे संकेत मिळत आहेत.

# संविधानामुळे सर्वसामान्यांना मान-सन्मान मिळाला – आ. खताळ

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आमदारांचे स्मारकास अभिवादन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सर्वसामान्य नागरिकांना मान-सन्मान मिळाला असून, त्याच संविधानाच्या बळावर माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला या तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार खताळ यांच्या हस्ते पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, पूर्वी समाजामध्ये अस्पृश्यता, शिक्षणाबाबत उदासीनता आणि अंधश्रद्धा यांचा मोठा प्रभाव होता. मात्र, डॉ. आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि लढा हा मूलमंत्र देऊन समाजातील विषमता दूर करण्याचे काम केले. त्यांच्या कार्यामुळे सर्व समाजघटकांना न्याय मिळाला आहे.

काहीजण शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा वापर केवळ भाषणांपुरता आणि निवडणुकांपुरता करतात; मात्र



आम्ही त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवत आहोत, असे सांगत आमदार खताळ यांनी विरोधकांवर टीका केली.

या कार्यक्रमाला आरपीआयचे ज्येष्ठ नेते संतोष रोहम, आरपीआय (आठवले गट) तालुका अध्यक्ष आशिष शेळके, शहराध्यक्ष कैलास कासार, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, रमेश काळे, देविदास कदम, शशांक नामन, लाला दायमा, अक्षय वर्पे, सौरभ देशमुख, सुशील शेवाळे, विकास जाधव, संगीता पुंड, रेखा गलांडे, सपना जाधव, अर्पिता पगारे, श्याम कोळपकर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

संगमनेरमध्ये मागील राज्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या मागे दारूचे दुकान सुरू करण्याचा पायंडा पाडला, ही फार मोठी खंत आहे. पुतळ्याचे टेंडर काढल्याचे सांगत काहीजणांनी यावर राजकारण सुरू केले आहे; मात्र मला त्या राजकारणात पडायचे नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळाही उभारण्यात येणार आहे.

– अमोल खताळ (आमदार)

# आश्रमशाळेतील मुलींचा विनयभंग

## शिक्षकाला अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - दहा अल्पवयीन मुलींचा विनयभंग झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

१ एप्रिल रोजी विनयभंग झाल्याची घटना उघडकीस आली. मुलींना आश्रमशाळेच्या अधीक्षक व मुख्याध्यापक यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर त्यांनी हे प्रकरण प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सोपविले होते. प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी करून राजूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी शिक्षकाविरुद्ध गुन्हा नोंदवून



त्याला अटक केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी शिक्षक गणेश पंढरीनाथ कोकाटे (वय ३२) याच्यावर गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. आरोपीला न्यायालयापुढे हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. दरम्यान, स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# परिवहन विभागाच्या भ्रष्ट कारभारामुळे रस्ते अपघातातील बळींची संख्या उच्चांकी पातळीवर – हर्षवर्धन सपकाळ

मुंबई ()-

राज्यभरातील रस्त्यांवर सातत्याने होत असलेले अपघात आणि त्यात मृत्यूमुखी पडणा-या नागरिकांची संख्या पाहता रस्ता सुरक्षेच्या बाबतीत राज्य सरकार पूर्णतः अपयशी ठरल्याचे स्पष्ट दिसत आहे. परिवहन विभागाच्या भ्रष्ट कारभारामुळेच राज्यात अपघातांची व बळींची संख्या उच्चांकी पातळीवर पोहोचली आहे. या अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुरबाड -कल्याण मार्गावर इको कारच्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ११ जणांना काँग्रेस पक्षाकडून श्रद्धांजली अर्पण करून, त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी किमान १५ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, तसेच या अपघाताला जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणीही त्यांनी केली.

कल्याणसह राज्यभरात विविध ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक सुरु असून त्यातून अपघात घडतात, पण परिवहन विभागाचे अधिकारी व पोलीस हप्ते घेऊ याकडे दुर्लक्ष करतात. परिवहन मंत्र्यांनी भाजप आमदार नरेंद्र मेहतांच्या मालकीच्या जमिनीतील वाटयाच्या राजकारणात गुंतण्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेकडे लक्ष दिले असते, तर अपघातांचे प्रमाण कमी झाले असते, असा टोला त्यांनी लगावला.

काही दिवसांपूर्वीच समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात सात महिलांचा मृत्यू झाला होता, तर ६ मार्च रोजीही त्याच मार्गावर तीन मजुरांचा बळी गेला होता. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, समृद्धी महामार्ग



आणि मुंबईसह राज्यभारातील महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यात राज्य सरकार अपयशी ठरल्याचे दिसून येते. हे अपघात परिवहन विभागाच्या गलथानपणाचे परिणाम आहेत.

२०१९ साली राज्यात रस्ते अपघातांत १२,७८८ जणांचा मृत्यू झाला होता. २०२४ मध्ये ही संख्या २३ टक्क्यांनी वाढून १५,७१५ वर पोहोचली. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील अपघातांची संख्या देखील चिंताजनकरीत्या वाढत आहे. २०२४ मध्ये या मार्गावर १३७ अपघात झाले होते, तर २०२५ मध्ये ही संख्या ३७ टक्क्यांनी वाढून १८५ वर पोहोचली. मृतांची संख्या २०२४ मध्ये १२६ वरून २०२५ मध्ये १५२ इतकी वाढली आहे.

२२ जानेवारी २०२६ रोजी परिवहन आयुक्तांनी माध्यमांसाठी जारी केलेल्या निवेदनात समृद्धी महामार्गावरील अपघातांची वाढती संख्या दडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. परिवहन विभागाने आपले अपयश लपवण्यासाठी केलेली ही धडपड सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळणारी ठरत असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# संगमनेर नगरपालिकेतील विकास कामांचा आढावा

## नागरिकांच्या समस्यांवर तत्काळ उपाययोजनांवर भर

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

आमदार सत्यजीत तांबे यांच्या समवेत संगमनेर नगरपालिकेतील विविध विकास कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, माजी नगराध्यक्ष विश्वास मुर्तडक तसेच प्रभाग क्रमांक १ ते ५ मधील नगरसेवक उपस्थित होते.




बैठकीदरम्यान नगरसेवकांनी आपल्या-आपल्या प्रभागातील विविध समस्या, अडचणी व प्रलंबित प्रश्न मांडले. यावर सखोल चर्चा करत संबंधित समस्यांच्या निराकरणासाठी ठोस उपाययोजनांची दिशा निश्चित करण्यात आली. विशेषतः नागरिकांच्या दैनंदिन अडचणी लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रशासनाने अधिक प्रभावी पावले उचलण्यावर भर देण्यात आला.

यावेळी संगमनेर २.० अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. या योजनांमुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

दरम्यान, नागरिकांना नगरपालिकेत वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप क्रमांक (९४२१४५६८५६) या उपक्रमालाही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे समोर आले. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी व सूचना पाठवल्या असून त्यांची दररोज नोंद घेऊन प्रत्येक सोमवारी साप्ताहिक आढावा घेतला जात आहे.

या पार्श्वभूमीवर प्राप्त तक्रारींचे जलद व प्रभावी निवारण करण्यासाठीही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महिला आरक्षणावरून सोनिया गांधींचा सरकारला सवाल

नवी दिल्ली (वार्ताहर)-

काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी यांनी महिला आरक्षणाबाबत सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यामागील हेतूंवर शंका व्यक्त केली आहे. एका लेखात त्यांनी म्हटले आहे की, प. बंगाल व तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय लाभासाठी हा प्रयत्न केला जात आहे. खरा मुद्दा मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा असून, ही नियोजित प्रक्रिया धोकादायक असून संविधानावरच हल्ला असल्याचा आरोप त्यांनी केला.

सरकारने २०२३ मध्ये 'नारी शक्ती वंदन अधिनियम' संसदेत मंजूर केला होता; मात्र आगामी जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच तो लागू करण्याची अट ठेवली. यावर विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपासूनच आरक्षण लागू करण्याची मागणी केली होती. मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे सांगत, आता विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी ३० महिने का लागले, असा सवाल सोनिया गांधी यांनी उपस्थित केला. दरम्यान, १६ ते १८ एप्रिलदरम्यान होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनासाठी काँग्रेस, भाजप आणि जदयू या पक्षांनी आपल्या खासदारांना उपस्थित राहण्याचे व्हीप जारी केले आहेत.

# वाढती उष्णता, काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -: भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये हवामान उष्ण व दमट राहील. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कोरडे हवामान वर्तविण्यात आले असून गेल्या दोन-तीन दिवसांपासून तापमानात काही प्रमाणात वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानवी व प्राण्यांच्या आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.



उष्माघाताची लक्षणे दिसताच नागरिकांनी तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क करावा. नागरिकांनी तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाणी कमी होऊ नये म्हणून ओ.आर.एस., लस्सी, ताक, कैरीचे पन्हे व लिंबू पाण्याचा नियमित वापर करावा. दुपारी बारा ते तीन वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री वा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्याने डोके, मान व चेहरा झाकावा. गडद, घट्ट व जाड कपड्यांऐवजी हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी नेहमी सोबत ठेवावे.

अशक्तपणा, डोकेदुखी व सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्णतेच्या लाटेची माहिती मिळवण्यासाठी रेडिओ, टी.व्ही. व वर्तमानपत्रांचा वापर करावा. उन्हात अतिकष्टाची व शारीरिक श्रमाची कामे करू नयेत. कामगारांनी उन्हात काम करताना डोक्यावर पांढरा रुमाल बांधावा. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्याबाबत कामगारांना सूचित करावे.

कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त काम उरकून घ्यावे व उन्हात काम करताना थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी. गरोदर स्त्रिया व आजारी कामगारांची विशेष काळजी घ्यावी. घरे थंड ठेवण्यासाठी व घरात थेट सूर्यप्रकाश येऊ नये म्हणून पडदे, झडपा, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे व ओले कपडे वापरून वेळोवेळी थंड पाण्याने स्नान करावे. उन्हाळ्याच्या काळात शक्यतो स्वयंपाक करणे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे खिडक्या उघड्या ठेवाव्यात. दारू, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे. तसेच उच्च प्रथिनयुक्त आहार व शिळे अन्न खाऊ नये.

# जलसंपदा विभागाला ऊर्जितावस्था

## मंत्री विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीची दखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वेगवान व लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे जलसंपदा विभागाला नवचैतन्य प्राप्त झाले असून विविध पाटबंधारे प्रकल्पांना गती मिळत आहे. जलसंपत्ती अभ्यासक तथा भाजपा अभियंता सेलचे सहसंयोजक इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये जलसंपदा विभागाच्या कामकाजात गतिमानता आली आहे. प्रलंबित व बांधकामाधीन प्रकल्प मार्गी लावण्याबरोबरच प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांनाही प्राधान्याने सोडविण्यात येत असल्याचे चकोर यांनी सांगितले.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांचा सखोल अभ्यास करण्यात येत आहे. या प्रकल्पांचा शेती सिंचन, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत निर्मिती यासाठी अधिक प्रभावी वापर कसा करता येईल, यावर भौगोलिक, तांत्रिक व आर्थिक स्तरावर नियोजन सुरू आहे. तसेच या महामंडळांना अधिक स्वायत्तता देण्याच्या दृष्टीनेही कार्यवाही गतीने सुरू आहे.

मंत्री विखे पाटील हे प्रत्येक जिल्ह्यातील प्रकल्पांचा नियमित आढावा घेत असून लोकप्रतिनिधींसह बैठका घेऊन अडचणी जागेवरच सोडविण्याचे निर्देश देत आहेत. यामुळे सिंचन प्रणाली कार्यक्षम ठेवण्यास मदत होत असून अभियंते व कर्मचाऱ्यांकडून शिस्तबद्ध कामकाज होत असल्याचे दिसून येत आहे.



जलसंपदा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतही सकारात्मक पावले उचलली जात असून विभागाची कार्यक्षमता वाढविण्यावर भर दिला जात आहे. तसेच विभागाच्या मालकीच्या जमिनींचे सर्वेक्षण करून त्या विभागाच्या नावावर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. धरणे, कालवे व वितरण प्रणालीवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीमही सुरू करण्यात आली आहे.

पावसाळ्यातील पूरस्थिती टाळण्यासाठी नदी, नाले व ओढ्यांवरील अतिक्रमण काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेता, ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी धरणांतील पाणी साठा आरक्षित ठेवण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. याशिवाय, पश्चिम घाटातून अरबी समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरी व कृष्णा खोऱ्यात वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेलाही गती देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांना वेगाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले असून मंत्री विखे पाटील स्वतः त्याचा सातत्याने पाठपुरावा करत आहेत.या सर्व उपक्रमांमुळे मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातील पिण्याचे पाणी आणि सिंचनाचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........................ 05
सेल्सगर्ल........................ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेरकरांची अश्वारूढ शिवस्मारकाला पसंती

## नगरपालिका सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर




**संगमनेरच्या जनभावनांचा आदर ठेवत विशेष बाब म्हणून स्मारकासाठी जागा वर्ग करण्यास मान्यता दिल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे देखील समस्त संगमनेरकरांनी आभार मानले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्मारकाबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असून संगमनेरकरांनी पूर्णाकृती अश्वारूढ स्मारकाला स्पष्ट पसंती दिली आहे.

शहरात शिवस्मारक उभारण्याचा विषय गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा करत नगरपालिकेकडे जागा वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश येत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मान्यतेने संगमनेर बस स्थानकासमोरील जागा नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आली. मात्र या स्मारकाच्या जागेच्या लढ्याची सुरुवात यापूर्वीच झाली होती. २०१८ साली तत्कालीन नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात बस स्थानक परिसरातील जागा स्मारकासाठी मिळावी यासाठी नगरपालिकेने मागणी केली. त्यानंतर महसूलमंत्री असताना बाळासाहेब थोरात यांनी हा प्रस्ताव मंत्रालयात पुढे नेला. मात्र एसटी महामंडळाच्या धोरणामुळे राज्यातील एसटी आवारात स्मारकास मनाई असल्याने हा विषय दीर्घकाळ प्रलंबित राहिला.

यानंतर २०२३ मध्ये आमदार सत्यजीत तांबे निवडून आल्यानंतर त्यांनी हा विषय पुन्हा मार्गी लावण्यासाठी विशेष पाठपुरावा केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विशेष बाब म्हणून निर्णय व्हावा यासाठी आग्रह धरला आणि अखेर स्मारकासाठी जागा उपलब्ध झाली. जागा उपलब्ध झाल्यानंतर नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ ते ७ मार्च दरम्यान नागरिकांमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक कसे असावे? याबाबत मतदान घेण्यात आले. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी सहभाग नोंदवला. काल जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार पूर्णाकृती अश्वारूढ स्मारकाला सर्वाधिक ६,५६४ मते मिळाली. उभ्या स्मारकाला ४,७६१ मते, तर सिंहासनाधीश्वर स्मारकाला ७६१ मते मिळाली. एकूण १२,०८६ नागरिकांनी मतदान केले. या निकालानुसार नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत अश्वारूढ स्मारक उभारण्याचा ठराव मंजूर करण्यात आला असून शहरात लवकरच भव्य स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासनाच्या मदतीसह लोकसहभागातून स्मारक उभारणार - आ.तांबे छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ स्मारकासाठी अंदाजे दीड कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. या खर्चासाठी शासनाच्या विविध योजनांमधून मदत घेणार आहे तसेच लोकसहभागातून देखील स्मारक उभे करणार असल्याचे आमदार तांबे यांनी स्पष्ट केले.

# संगमनेरात तीन घरांवर चोरट्यांचा डल्ला

## सोने-चांदी, रोख रक्कम लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहराजवळील निर्मलनगर आणि राजमुद्रानगर उंबराचा मळा येथे तीन ठिकाणी बंद घरांना लक्ष्य करत चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख सात हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.

निर्मलनगर येथील सोमनाथ बाळासाहेब कार्ले शनिवारी संध्याकाळी सहा वाजता घराला कुलूप लावून मूळगावी कासारे येथे गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता घरी आले तेव्हा खिडकीचे गज तोडून चोरट्यांनी घरातील साहित्य अस्ताव्यस्त करून अडीच तोळे वजनाचे गंठण (८०,००० रुपये), पाच हजार रुपयांचे अर्धा ग्रॅम वजनाचे ओमपान, सहा हजार रुपयांचे चांदीचे पैंजण जोड, असा मुद्देमाल चोरून नेला.

राजमुद्रानगर उंबराचा मळा येथील नामदेव सोमनाथ वायळ आणि उत्तम त्रिंबक देशमुख दोन्ही कुटुंबीय घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्याची संधी साधत चोरट्यांनी वायळ यांच्या खिडकीचे गज वाकवून आत प्रवेश केला. नंतर तीन हजार रुपयांची सोन्याची अंगठी व ओमपान, तीन हजार रुपयांचे चांदीचे कडे, तर देशमुखांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील नऊ हजार रुपयांचे दोन चांदीचे छल्ले, दोन चांदीचे शिक्के, चांदीची गणपती मूर्ती आणि चारचाकी व दुचाकी वाहनांची चावी, असा सर्व मिळून एक लाख सात हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. याप्रकरणी सोमनाथ कार्ले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# पाच राज्यातील निवडणूकीनंतर इंधन महागणार

नवी दिल्ली - कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल १८ आणि डिझेल ३५ प्रति लिटरपर्यंत महाग होऊ शकते. विदेशी ब्रोकरेज फर्म मॅक्वायरीच्या अहवालात म्हटले आहे की, कच्चे तेल महाग असूनही देशात पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर आहेत. यामुळे कंपन्यांना नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत, पश्चिम बंगालसह ५ राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर कंपन्या दर वाढवू शकतात.

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे कंपन्यांना प्रति लिटर पेट्रोलवर १८ रुपये आणि डिझेलवर ३५ रुपयांचे नुकसान होत आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना, या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे २,४०० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात केल्यानंतर, हे नुकसान कमी होऊन १,६०० कोटी रुपयांवर आले आहे. प्रत्येक १० डॉलरच्या वाढीमुळे नुकसान प्रति लिटर सुमारे ६ रुपयांनी वाढते. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८८% कच्चे तेल आयात करतो. यापैकी ४५% मध्य पूर्वेतून आणि ३५% रशियातून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे, तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठी देखील धोकादायक आहेत. असा अंदाज आहे की २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ही तूट वाढून २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते.सरकारी महसुलात तेलावरील उत्पादन शुल्काचे योगदान सातत्याने कमी होत आहे. आर्थिक वर्ष २०१७ मध्ये ते २२% होते, जे आता घटून फक्त ८% राहिले आहे. जर सरकारने संपूर्ण उत्पादन शुल्क काढून टाकले तरी, सध्याच्या किमतींवर तेल कंपन्यांचे नुकसान पूर्णपणे संपणार नाही.


# युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद

युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्हूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.

संगमनेरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमा दरम्यान फटाके व डीजेमुळे गोंधळ उडाला. आ. अमोल खताळ यांच्या आगमनावेळी कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली; पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी



आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य



जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25